9973६९।८२

<u>कायम विना अनुदान</u>.

जा.क्र.माध्य.३(१५)/५ते७/पुवि/एफ४२/०६ -
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे - १ यांचे कार्यालय.
दिनांक : 2 JUN 2006

प्रति,

शिक्षणाधिकारी, (माध्यमिक)
जिल्हा परिषद पुणे

<u>विषय</u> : <u>इयत्ता ५ वी चा वर्ग माध्यमिक शाळेत सुरु करण्यास परवानगी देणे बाबत.</u>
शाळाः- काळभैरवनाथ माध्यमिक विद्यालय, मालखेड, हवेली, पुणे

संदर्भ : १. आपले पत्र क्रमांक : जिप/ शिक्षण/माध्य/ह४/१११/०६, दि. २७/४/०६
२. शासन निर्णय क्रमांक एसएसएन-१००२(२५६/२००२)/माशि-१
दिनांक :- २७.६.२००३
३. संस्थेचे प्रतिज्ञापत्र दि. २२/३/०४

उपरोक्त विषयाधिन संदर्भीय पत्रान्वये कळविण्यात येते की,या कार्यालयाने इ.८ वी चा वर्ग सुरु करणेस सन२०००-.०१ या शैक्षणिक वर्षापासून मान्यता दिलेली आहे. सदर शाळेत सध्या इ.८ वी ते १० वी चे वर्ग सुरु असून संदर्भ क्रमांक २ अन्वये व संस्थेच्या संदर्भिय पत्र क्रमांक ३ च्या प्रतिज्ञापत्राचे अधिन राहून सदर शाळेस सन <u>जुन २००३</u> शैक्षणिक वर्षा पासून इ.५ वी चा वर्ग सुरु करण्यांस खालील अटींच्या अधिन राहून मान्यता देणेत येत आहे.

## कायम विना अनुदान

१. इयत्ता ५ वी ते ७ वी च्या वर्गाची परवानगी ही **कायम विना अनुदान** तत्वावर राहील.

२. माध्यमिक शाळा संहिता नियम ३.२ नुसार सर्व अटींची पूर्तता शाळेने करणे आवश्यक आहे.

३. वेळोवेळी निर्गमित करण्यात येणारे शासन आदेश/नियम संस्थेवर बंधनकारक राहतील.

४.इ.५ वी ते ७ वी च्या वर्गाना सर्व भौतिक सुविधा उपलब्ध करुन देण्यात याव्यांत.

५. सदर कायम विनाअनुदान वर्गासाठीच्या शिक्षक/शिक्षकेतर कर्मचा-यांच्या वेतनाची जबाबदारी संस्थेची असेल.

६. भविष्यांत सदर वर्गाना अनुदानाची मागणी करता येणार नाही.

वरील प्रमाणे संबंधितांस कळवावे. शाळेने सुरु केलेल्या सदर वर्गाची तपासणी वार्षिक तपासणीच्या वेळी करावी व त्या बाबतचे योग्य ते अभिप्राय तपासणी अहवालामध्ये नमूद करावेत. तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

मूळ प्रतीवर शिक्षण उपसंचालक यांची स्वाक्षरी आहे.

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१

प्रतिलिपी -

१. मा. अवर सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ३२
२. मुख्याध्यापक, काळभैरवनाथ माध्यमिक विद्यालय, मालखेड, हवेली-पुणे
३. निवडनस्ती

पुणे जिल्हा परिषद, पुणे.
"यशवंतराव चव्हाण भवन"
शिक्षण [माध्यमिक] विभाग.
जा.क्र.शिक्षण/माध्य/ई-४/९५४
नै.वाढ/०४-०५.
पुणे. दिनांक : १९/६/२००६.

प्रति,

मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका,
काळभैरवनाथ माध्यमिक विद्यालय,
माळखेड, ता. हवेली, जि. पुणे.

विषय : नैसर्गिक वाढीने परवानगी देणेबाबत. २००४-०५
===== इ.६ वी, इ.७ वी, इ.९ वी, इ.१० वी.
=============================================

आपल्या श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, सासवड. या शैक्षणिक संस्थेव्दारा संचलित काळभैरवनाथ माध्य. विद्यालय, माळखेड. माध्यमिक विद्यालयास इ.८ वी/इ.५ वी.चा वर्ग सुरु करणेस सन २००३-०४ या शैक्षणिक वर्षापासून मा.शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचेकडील आदेश क्र.माध्य/३[१४]/नमाशा/मान्यता/पुव/११३७५/८२, दि. २/६/२००६ अन्वये शासनाची परवानगी मिळालेली आहे. सन २००४-२००५ या शैक्षणिक वर्षापासून आपल्या माध्यमिक शाळेत इ.६ वी, इ.७ वी, इ.९ वी, इ.१० वी चा वर्ग नैसर्गिक वाढीने सुरु होत आहे. सदर वर्गास जून २००४ पासून नैसर्गिक वाढीने परवानगी देणेत येत आहे. तरी आपण सदर वर्गाची वार्षिक तपासणी करुन घेणेसाठी संबंधित उपशिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, पुणे/गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती हवेली यांचेशी संपर्क साधावा. तसेच शाळेची वेळेत तपासणी करुन घेवून तपासणी अहवाल त्वरित या कार्यालयाकडे सादर करणेत यावा.

ज्या माध्यमिक शाळांमध्ये नैसर्गिक वाढीने इ.१० वी. चा वर्ग सुरु होत आहे, अशा सर्व माध्यमिक शाळांनी मा. विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे विभागीय मंडळ, पुणे १० यांचे कार्यालयाशी संपर्क साधावा. त्याप्रमाणे कागदपत्रांची पूर्तता वेळेत करावी अन्यथा शाळेस संकेतांक न मिळाल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही, याची नोंद घेणेत यावी.

शिक्षणाधिकारी [माध्यमिक]
जिल्हा परिषद, पुणेकरिता.

पुणे जिल्हा परिषद, पुणे.
"यशवंतराव चव्हाण भवन"
शिक्षण [माध्यमिक] विभाग.
जा.क्र.शिक्षण/माध्य/ह-४/१५७/
नै.वाढ/०५-०६.
पुणे. दिनांक : १५/६/२००६.

प्रति,

मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका,
काळभैरवनाथ माध्यमिक विद्यालय,
माळखेड, ता. हवेली, जि. पुणे.

विषय : नैसर्गिक वाढीने परवानगी देणेबाबत.२००५-०६.
===== इ.६ वी, इ.७ वी, इ.९ वी, इ.१० वी.

आपल्या श्री.शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, सासवड. या शैक्षणिक संस्थेव्दारा संचलित काळभैरवनाथ माध्य. विद्यालय, माळखेड. माध्यमिक विद्यालयास इ.८ वी/इ.५ वी.चा वर्ग सुरु करणेस सन २००३-०४ या शैक्षणिक वर्षापासून मा.शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचेकडील आदेश क्र.माध्य/३[१४]/नमाशा/मान्यता/पुवि/११३७१/२२, दि. २/६/२००६, अन्वये शासनाची परवानगी मिळालेली आहे. सन २००५-२००६ या शैक्षणिक वर्षापासून आपल्या माध्यमिक शाळेत इ.६ वी, इ.७ वी, इ.९ वी, इ.१० वी चा वर्ग नैसर्गिक वाढीने सुरु होत आहे. सदर वर्गास जून २००५ पासून नैसर्गिक वाढीने परवानगी देणेत येत आहे. तरी आपण सदर वर्गाची वार्षिक तपासणी करुन घेणेसाठी संबंधित उपशिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, पुणे/गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती हवेली यांचेशी संपर्क साधावा. तसेच शाळेची वेळेत तपासणी करुन घेवून तपासणी अहवाल त्वरित या कार्यालयाकडे सादर करणेत यावा.

ज्या माध्यमिक शाळांमध्ये नैसर्गिक वाढीने इ.१० वी. चा वर्ग सुरु होत आहे, अशा सर्व माध्यमिक शाळांनी मा.विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे विभागीय मंडळ, पुणे १० यांचे कार्यालयाशी संपर्क साधावा.

त्याप्रमाणे कागदपत्रांची पूर्तता वेळेत करावी अन्यथा शाळेस संकेतांक न मिळाल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही, याची नोंद घेणेत यावी.

शिक्षणाधिकारी [माध्यमिक]
जिल्हा परिषद, पुणे करिता.

"यशवंतराव चव्हाण भवन"
जिल्हा परिषद पुणे.
शिक्षण विभाग [माध्यमिक]
जा.क्र.शिक्षण/माध्य/ह-४/प्र.मा./०७-०२
पुणे, दि. २५/७/२००२.

प्रति,

~~सचिव~~/मुख्याध्यापक,
काळभैरवनाथ माध्यमिक विद्यालय, मालखेड
ता. हवेली

विषय :- इ. ९ वी च्या वर्गास प्रथम मान्यता देणेबाबत.

उपरोक्त विषयानुसार कळविण्यात येते की, आपल्या ~~संस्थेच्या~~ काळभैरवनाथ माध्यमिक विद्यालय, मालखेड या माध्यमिक विद्यालयातील इ. ८वी च्या वर्गास मा. शि. उपसंचालक, पुणे विभाग, पुणे १ यांचेकडील आदेश क्र. माध्य-३[१४]/नमाशा/मान्यता/पुवि/९३८८/०२ दि. २।४।०२ अन्वये परवानगी देणेत आलेली आहे. माध्यमिक शाळा संहिता नियम क्रमांक ५.२ नुसार उपरोक्त शाळेत जून २००१ पासून इ. ९ वीच्या वर्गास विना अनुदान तत्वावर खालील अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर परवानगी देणेत येत आहे.

१] ग्रंथालय प्रयोग साहित्य नोंदवह्या नियमानुसार असाव्यात
२] पुरेशा प्रमाणात क्रीडा साहित्य असावे
३]
४]
५]
६]

मा. शि. अ. यांची
मान्य टिपणी

शिक्षणाधिकारी [माध्य]
जिल्हा परिषद पुणे.

प्रत,

१. मुख्याध्यापक,
--------------------------------
--------------------------------

34/5. 3

"यशवंतराव चव्हाण भवन"
जिल्हा परिषद पुणे.
शिक्षण विभाग [माध्यमिक]

जा. क्र. शिक्षण/माध्य/ह-४/नै. वा. /०२-०३

पुणे, दि. ७/६/२००२.

प्रति,

मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका,

काळभैरवनाथ माध्यमिक विद्यालय, माल्खेड.
ता. हवेली.

विषय :- नैसर्गिक वाढीने परवानगी देणेबाबत. ०२-०३.

~~इ. ६ वी~~, ~~इ. ७ वी~~, इ. ९ वी, इ. १० वी.

आपल्या श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, या शैक्षणिक संस्थेव्दारा संचलित काळभैरवनाथ माध्य. विद्यालय, माल्खेड. माध्यमिक विद्यालयास इ. ८ वी / ~~इ. ९ वी~~ या वर्ग सुरु करणेस सन २००० - २००१ या शैक्षणिक वर्षापासून मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचेकडील आदेश क्र. माध्य/३[१४]/नमाशा/मान्यता/पुवि/११८८३/२००१, दि. २/४/०२ अन्वये शासनाची परवानगी मिळालेली आहे. सन २००१-०२ या शै. वर्षापासून इ. ९ वीच्या वर्गास सन २००२ - २००३ या शैक्षणिक वर्षापासून आपल्या माध्यमिक शाळेत ~~इ. ६ वी~~, ~~इ. ७ वी~~, ~~इ. ९ वी~~, इ. १० वी या वर्ग नैसर्गिक वाढीने सुरु होत आहे. सदर वर्गास जून २००२ पासून नैसर्गिक वाढीने परवानगी देणेत येत आहे. तरी आपण सदर वर्गाची वार्षिक तपासणी करुन घेणेसाठी संबंधित ~~उपशिक्षणाधिकारी, जि. प. पुणे~~ / गट शिक्षणाधिकारी, पं. स. हवेली. यांचेशी संपर्क साधावा. तसेच शाळेची वेळेत तपासणी करुन घेवून तपासणी अहवाल त्वरित या कार्यालयाकडे सादर करणेत यावा.

ज्या माध्यमिक शाळांमध्ये नैसर्गिक वाढीने इ. १० वीचा वर्ग सुरु होत आहे अशा सर्व माध्यमिक शाळांनी मा. विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे विभागीय मंडळ, पुणे १० यांचे कार्यालयाशी संपर्क साधावा. त्याबाबत आवश्यक असणा-या कागदपत्रांची यादी सोबत देणेत येत आहे. त्याप्रमाणे कागदपत्रांची पूर्तता वेळेत करावी अन्यथा शाळेस संकेतांक न मिळाल्यास हे कार्यालय जबाबदार रहाणार नाही याची नोंद घेणेत यावी. [ मागील बाजूस कागदपत्रांची यादी आहे. ]

J. N. Hande

शिक्षणाधिकारी [माध्यमिक]
जिल्हा परिषद पुणे. करिता.

सांकेतिक क्रमांकासाठी प्रस्तावांसोबत जोडावयाच्या प्रमाणपत्रांची यादी.

१. मुखपृष्ठ पत्र.

२. विहित नमुन्यातील शिफारस प्रपत्र [इंग्रजी व मराठी]

३. या कार्यालयाने दिलेल्या शाळा परवानगी पत्राची प्रत.

४. या कार्यालयाने दिलेल्या प्रथम मान्यता पत्राची प्रत.

५. इ. ९ वी, इ. १० वी नैसर्गिक वाढीने परवानगी पत्र.

६. ~~शाळा वार्षिक तपासणी अहवाल.~~

७. संस्थेची घटना. [झेरॉक्स प्रत साक्षांकित केलेली.]

८. संस्थेच्या कार्यकारी मंडळाची यादी. मा. धर्मादाय आयुक्त यांनी मान्य केलेली.

९. इ. १० वी तील विद्यार्थ्यांची यादी.

१०. शासन निर्णय व खात्याचे नियम काटेकोरपणे पालन करणेबाबत संस्थेचे रु. २०/- च्या स्टॅम्प पेपरवर संस्थाप्रमुखाचे हमीपत्र.

११. संस्थेविरुध्द गैरव्यवहाराबाबत अथवा न्यायालयात प्रकरण नसलेबाबत संस्था प्रमुखाचे हमीपत्र व त्यावर संबंधित तपासणी अधिकारी यांची स्वाक्षरी.

सदर कागदपत्र दोन प्रतीत या कार्यालयास सादर करावी व एक प्रत विभागीय शिक्षण मंडळाकडे सादर करावी.

---